पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in




**अभ्यासमंडळे विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/ ५५५१ दिनांक : 23 JUN 2021

प्रति

१) **मा. प्राचार्य/प्राचार्या**
सर्व संलग्नित महाविद्यालये
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२) **मा. संचालक**
विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय: राजर्षी शाहू महाराज पुरस्काराबाबत..**

संदर्भ :दि.१२ जानेवारी, २०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र.५

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मा.सचिव शाहू शिक्षण संस्था, शहाद पश्चिम, कल्याण जि. ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या रु. १, ००,०००/- (अक्षरी एक लक्ष) निधी रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी विद्यापीठ वर्धापन दिनी उपेक्षित वर्गातील प्रथम येणा-या गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थिनीस **राजर्षी शाहू महाराज** या महामानवाच्या नावाने पुरस्कार दिला जातो.

सबब, सोबतची नियमावली अवलोकनी घेवून प्रत्येक महाविद्यालये / संकुले यांनी **राजर्षी शाहू महाराज** या महामानवाच्या नावाने पुरस्कार देण्याकरिता एका विद्यार्थी/विद्यार्थिनीचे नाव विद्यापीठ कार्यालयास दि.२८/०६/२०२१ पर्यंत कळवावे. तसेच पुरस्कारासाठी निवड करतांना सदरचा विद्यार्थी /विद्यार्थिनी हा /ही पदवी / पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षात शिकणारे असावेत, याची कृपया काळजी घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. डॉ.वि.भा.घुटे)
प्र.कुलसचिव

सोबत: नियमावलीची छायांकित प्रत.

व्यवस्थापन परिषद

विषय क्रमांक ( 5 )
दिनांक : 12 JAN 2012

०५ ] उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना "राजर्षी शाहू महाराज पुरस्कार" देणेकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

(टिपणी - शाहू शिक्षण संस्था, कल्याण, जि. ठाणे या संस्थेकडील रु. १,००,०००/- निधी धनाकर्ष म. वि. का. १९९४ कलम २८ (h) नुसार व्यवस्थापन परिषदेने दि. १९/५/२०११ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४ अन्वये स्वीकारला आहे. सदर निधीतून उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना "राजर्षी शाहू महाराज पुरस्कार " देणेसंबधीची नियमावली तयार करणेकामी मा. कुलगुरुमहोदयांनी खालील त्रिसदस्यीय समिती नियुक्त केलेली आहे.

१) प्रा. मदने डी. व्ही.

२) प्रा. भोसले यु. व्ही.

३) प्रा. शिंदे जी. बी.

उक्त समितीने तयार केलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

सबब, सन २०१०-११ या शै. वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीच्या व्याजातून दरवर्षी उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना " राजर्षी शाहू महाराज " यांच्या नावाने पुरस्कार देणेसाठीची नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)

ठराव : उपेक्षित वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना "राजर्षी शाहू महाराज पुरस्कार" देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या नियमावलीच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली.

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## राजर्षी शाहू महाराज पुरस्कार बाबत नियमावली

**नियम क्र. १ :**

सर्व संलग्न महाविद्यालयात / विद्यापीठ संकुलात शिक्षण घेत असलेल्या उपेक्षित वर्गातील विद्यार्थ्यांचे एक नाव संलग्न महाविद्यालयांनी व संकुलांनी राजर्षी शाहू महाराज पुरस्कारासाठी नांव पाठवावे.

**नियम क्र. २ : राजर्षी शाहू महाराज पुरस्कारसाठीची निवड समिती**

१) मा. कुलगुरु , सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (अध्यक्ष)
२) अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा (सदस्य)
३) मा. कुलगुरु नियुक्त एक शिक्षक/व्यवस्थापन परिषद सदस्य (सदस्य)

सदर समितीने उपसमितीने सुचविलेल्या अथवा समितील योग्य वाटेल अशा उमेदवारांच्या मुलाखती घेवून नाव निश्चित करणे. सदर मुलाखतीस एकूण ५० गुण असतील.

**नियम क्र. ३ :**

१) महाविद्यालयांनी / संकुलांनी विद्यापीठाकडे एकच विद्यार्थी पुरस्कारासाठी सुचवावा आणि प्राप्त प्रस्तावांच्या छाननीकरीता खालीलप्रमाणे उपसमिती नेमून, त्या समितीने दहा (१०) नावांची शिफारस मुलाखतीकरीता करावयाची आहे.

**उपसमिती -**

i) अधिष्ठाता, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा — अध्यक्ष
ii) एक संकुल संचालक (मा. कुलगुरु नियुक्त) — सदस्य
iii) एक महाविद्यालय प्राचार्य (मा.कुलगुरु नियुक्त) — सदस्य
iv) एक सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचा शिक्षक (मा. कुलगुरु नियुक्त) — सदस्य

२) पुरस्कारासाठी निवड करतांना सदरचा विद्यार्थी हा पदवीच्या / पदव्युत्तर पदवीच्या अंतीम वर्षात शिकणारा असावा.

३) निवड करतांनाच्या १२ वी नंतरच्या सर्व शैक्षणिक वर्षातील खालीलप्रमाणे गुणदान घ्यावे.

➢ शैक्षणिक अर्हतेचे गुण मात्र निवड वर्षाच्या आगोदरच्या शैक्षणिक वर्षाचे असावे.

## नियम क्र. ४ :

पुरस्काराचे स्वरुप :- प्रशस्तीपत्र व रु. ३००० ते रु. ५०००/- (प्रशासकीय खर्च व कॉरपस रक्कम वजा जाता व्याजातून शिल्लक राहीलेली रक्कम रु. ५००/- चे पटीत रोख रक्कम)

## नियम क्र. ५ :

पुरस्कारासाठी विद्यार्थ्यांची निवड करताना खालीलप्रमाणे निकष विचारात घ्यावयाचे आहेत.

(अ) शैक्षणिक अर्हता — जास्तीत जास्त २५ गुण

| अ. क्र. | वर्गवारी | गुण |
|---|---|---|
| (१) | विद्यापीठात गुणवत्ताधारक (पहिले तीन) | १० |
| (२) | एखादया विषयात प्रथम | ०६ |
| (३) | ८० % पेक्षा जास्त | ०४ |
| (४) | ७१ ते ८० % | ०३ |
| (५) | ६१ ते ७० % | ०२ |
| (६) | ५१ ते ६० % | ०१ |

(ब) खेळातील प्राविण्य — जास्तीत जास्त २५ गुण

| अ. क्र. | वर्गवारी | वैयक्तिक व्यक्तिमत्व | सामुहीक व्यक्तिमत्व / प्रति खेळ प्रकार |
|---|---|---|---|
| (१) | आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळातील प्राविण्य | १५ | १२ |
| (२) | आंतरराष्ट्रीय खेळात सहभाग | ०७ | ०६ |
| (३) | राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय विद्यापीठ खेळातील प्राविण्य | ०५ | ०४ |
| (४) | राष्ट्रीय / आंतर विद्यापीठ खेळात सहभाग | ०३ | ०३ |
| (५) | राज्य / आंतरराज्य विद्यापीठ प्राविण्य | ०२ | ०२ |
| (६) | राज्य / आंतरराज्य विद्यापीठ सहभाग | ०१ | ०१ |

(क) सांस्कृतिक प्राविण्य — जास्तीत जास्त २५ गुण

| अ. क्र. | वर्गवारी | प्रती सहभाग |
|---|---|---|
| (१) | आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत,चर्चासत्र, कार्यशाळेतील पारितोषिक | १५ गुण |
| (२) | राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रातील प्राविण्य | ७ गुण |
| (३) | राष्ट्रीय युवा महोत्सव पारितोषिक | ५ गुण |
| (४) | राष्ट्रीय युवा महोत्सवात विभागीय पारितोषिक | ३ गुण |
| (५) | केंद्रिय युवा महोत्सवातील पारितोषिक | २ गुण |
| (६) | जिल्हा स्तरावरील युवा महोत्सवातील पारितोषिक | १ गुण |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

(ड) महात्मा ज्योतीराव फुले, क्रांतीदेवी सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज,प. पू. डॉ. बाबसाहेब आंबेडकर आणि शाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांवरील लेखना बाबतचे पुरस्कार / पारितोषिके

जास्तीत जास्त २५ गुण

| अ. क्र. | वर्गवारी | गुण प्रती सहभाग |
|---|---|---|
| (१) | साहित्य ॲकॅडमी पारितोषिक | १० गुण |
| (२) | राज्य पातळीवर पारितोषिक | ०७ गुण |
| (३) | पुस्तक प्रकाशन | ०४ गुण |
| (४) | आंतरविद्यापीठ स्पर्धेतील पारितोषिक | ०३ गुण |
| (५) | विद्यापीठ पातळीवरील स्पर्धेतील पारितोषिक | ०३ गुण |
| (६) | दर्जात्मक मासिकातील लेख प्रसिध्दीसाठी पारितोषिक | ०२ गुण |
| (७) | दैनिकातील लेख प्रसिध्दीसाठी | ०१ गुण |

(इ) <u>सामाजिक कार्याबाबतचे पुरस्कार</u>

जास्तीत जास्त २५ गुण

| अ. क्र. | वर्गवारी | गुण प्रती सहभाग |
|---|---|---|
| (१) | आंतरराष्ट्रीय पुरस्कार | १० गुण |
| (२) | राष्ट्रीय पुरस्कार | ०७ गुण |
| (३) | राज्य पुरस्कार | ०५ गुण |
| (४) | विद्यापीठ पातळीवरील पुरस्कार | ०१ गुण |
| (५) | जिल्हा स्तरावरील | ०१ गुण |

(ई) राष्ट्रीय छात्र सेना

जास्तीत जास्त २५ गुण

| अ. क्र. | वर्गवारी | गुण प्रती सहभाग |
|---|---|---|
| (१) | राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.) राष्ट्रीय पुरस्कार/ प्रजासत्ताक दिन संचलन (R.D. Parade) / गुणवंत छात्र (Best Cadet) | १० गुण |
| (२) | प्रजासत्ताक दिन स्पर्धेत सहभाग (Participation in R.D. Competition) / सुरक्षादलातील सहयोग (Army attachment), शिबिर प्रमुख (Leadership Camp) | ०५गुण |
| (३) | एन. सी. सी. "क" प्रमाणपत्र | ०५ गुण |
| (४) | एन. सी. सी. " ब " प्रमाणपत्र + कॅम्प | ०५ गुण |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**नियम क्र. ६:** देणगी रकमेच्या येणाऱ्या व्याजामधून प्रशासकीय खर्च १० टक्के व कॉरपस रक्कम २५ टक्के वजा जाता उर्वरीत ६५ टक्के रकमेतून पुरस्कार देण्यात येईल.

**नियम क्र. ७:** देणगी रकमेबाबत इतर पूरक माहिती खालीलप्रमाणे (उदाहरणादाखल)

| | | | |
|---|---|---|---|
| i) | मूळ देणगी रक्कम रुपये | - | १,००,०००/- |
| ii) | ९ % व्याज दर | - | |
| iii) | मिळणारे व्याज | - | ९, ०००/- |
| iv) | १० % प्रशासकीय खर्च | - | ९,००/- |
| v) | २५ % कॉरपस रक्कम<br>(सदरची रक्कम दरवर्षी मूळ देणगी रकमेमध्ये जमा करण्यात येईल.) | - | २,२५०/- |
| vi) | येणाऱ्या व्याजातून वजा होणारी रक्कम | - | ३,१५०/- |
| vii) | व्याजातील शिल्लक रक्कम रुपये<br>(पुरस्कार रक्कम) | - | ५,०५०/- |

**नियम क्र. ८:** छत्रपती राजर्षि शाहू महाराज पुरस्कार प्रतिवर्षी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या दिवशी देण्यात येईल.

**नियम क्र. ९:** पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या वेळी संस्थेच्या प्रतिनिधीला आमंत्रित करण्यात येईल.